**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ११ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - विजय चंद्रपालजी गंगावने,

**वय** - **४२** वर्ष, **पद -** वन परिक्षक अधिकारी, खापा,

**नेमणूक** - खापा, तह. सावनेर, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत.**

**०१.** दिनांक १४.०३.२०२५ रोजी भानगळा नाला, मौजा सिरोंजी येथे दुपारी २.३० वाजताच्या दरम्यान तेथील पोलीस पाटील श्री भिमटे यांनी माहिती दिली की, वाघ मयत पडला आहे. त्याठिकाणी सतिष गडलिंगे क्षेत्र सहाय्यक अतिरिक्त, नागलवाडी तसेच वन परिक्षेत्र अधिकारी श्री आठवले, वन रक्षक श्री. कुकलारे, वनरक्षक श्री डाखोरे, वन रक्षक खूबाळा आणि वन रक्षक श्री शेलार यांनी घटनास्थळी पंचनाम्याला सुरवात केली. मला फोन आल्यावर मी घटनास्थळी पोहोचलो. मी वाघाचे मोजमाप घेतले. वाघाचे नाक ते शेपटीपर्यंतचे अंतर २९० सेमी होते. त्याच्या शेपटीची लांबी ९२ सेमी होती. त्याच्या समोरील पायाची लांबी ८८ सेमी व मागील पयाची लांबी ९७ सेमी होती. मागील पायापासून ते समोरील पायापर्यंतचे अंतर ८४ सेमी होते. मागील दोन्ही पायामधील अंतर २९ सेमी होते. समोरील पायामधील अंतर २५ सेमी होते. वाघाची कानाची लांबी ९ सेमी होती. दोन्ही कानामधील अंतर १८ सेमी होते. मानेचा घेर ८० सेमी होता. छातीचा घेर ११८ सेमी होता. वाघ भुरकट रंगाचा पट्टेदार होता. त्याचे वय साडे तीन वर्षे होते. ज्या दिशेने वाघ पडला होता, त्याचे तोंड उत्तरेला होते व शेपूट दक्षिणेला होते. आजुबाजुच्या परिसराची मी पाहणी केली. त्याच्या बाजूला अडीच मिटर अंतरावर एक बोरीचे लाकूड मिळाले. ते मला दाखवल्यास मी ओळखू शकतो, ते मला दाखवण्यात आले. ते तेच आहे. ते एमओ क्र. १ वर आहे. बोरीच्या लाकडापासून जळलेली इलेक्ट्रीक तार दीड मिटर अंतरावर पडली होती. त्याची लांबी ९९ सेमी होती. ती मला दाखवल्यास मी ओळखू शकतो, ती मला दाखवण्यात

आले. ती तीच आहे. ते एमओ क्र. ३ वर आहे. त्याच्या उत्तरेस आम्ही पाहणी केली असता, त्या ठिकाणाहून २५० मिटर अंतरावर एक शेकोटी पेटवली होती. त्याच दिशेने जमीनील रोवलेल्या ८ लाकडी खूंट्या दिसल्या. त्या मला दाखवल्यास मी ओळखू शकतो, त्या मला दाखवण्यात आले. त्या त्याच आहेत. त्या एमओ क्र. २ वर आहे. त्यानंतर आम्ही दक्षिण दिशेला आलो. तिथे ११ केव्हीचा खांब होता व त्यावरुन विद्यूत वाहीनी गेली होती. त्या दिशेने सेंट्रींग तारेचे बंडल मिळाले. सेंट्रींग तारेचे बंडल मला दाखवण्यात आले. ते तेच आहे. ते एमओ क्र. ८ वर आहे. श्वान पथक घेवून शोध घेतला. मोका पंचनामा सायंकाळी ५.०० वाजता संपवला. दोन पंच घेतले होते. त्यांची नावे धुर्वे व परतेकी होती. आता मला मोका पंचनामा दाखवण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर ईतर अधिकारी यांची देखील सही आहे. तो नि.क्र.१४ वर आहे.

**०२.** वाघाचे शव विच्छेदन करण्यात आले. त्याच्या अवयवांचे दहा नमूने घेतले. लाकडे जमा करुन वाघाचे अंतिम संस्कार केले, तसा पंचनामा केला. तो मला दाखवण्यात आला, त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, तो नि.क्र.१५ वर आहे.

**०३.** मी आरोपींचे वन संरक्षण कायदर कलम ५०(८)(अ) प्रमाणे बयाण घेतले होते. मला छेदीराम ठाकूर यांचे बयाण दाखवण्यात आले, त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.७९** देण्यात येते. मला पंढरी कुंभरे यांचे दिनांक १७.०३.२०२५ रोजीचा सकाळी १०.०० वाजता घेतलेला बयाण दाखवण्यात आले, त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.८०** देण्यात येते. मला किशोर भलावी यांचे बयाण दाखवण्यात आले, त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.८१** देण्यात येते. मला नंदू भलावी यांचे बयाण दाखवण्यात आले, त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.८२** देण्यात येते. मला पंढरी कुंभरे यांचे

दिनांक १७.०३.२०२५ रोजीचा सायंकाळी ४.०० वाजता घेतलेला बयाण दाखवण्यात आले, त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.८३** देण्यात येते.

**०४.** मी आरोपींना अटक केली होती, त्याप्रमाणे ६ अटक पंचनामे केले. त्यास **नि.क्र.८४ ते ८९** देण्यात येते. दिनांक १९.०३.२०२५ रोजी पंढरी कुंभरे याचा कबूली जबाब घेतला. त्याने सांगितले की, गजानन पाटील यांच्या शेतावर करंट लावून वन्य प्राण्याची शिकार केली. पंढरी कुंभरे याने गजानन पाटील यांच्या शेतावर नेवून स्पॉट दाखवला, त्याने दाखवल्याप्रमाणे रस्त्याच्या लगत गजानन पाटीलच्या शेतात झोपडी होती व त्या झोपडीमध्ये जर्मनचे घमेले होते. त्याने सांगितले की, मासचे तुकडे कापून तो त्या घमेल्यामध्ये ठेवायचा. तसेच ताळपत्री दाखवली. तेथून तो आम्हाला ५० मिटर पुढे घेवून गेला. तिथे त्याने दोन तारेचे बंडल दाखवले. ते बंडल आम्ही जप्त केले. परिसराची पाहणी केली. ११ केव्हीची लाईन तेथून गेली होती. त्याने तेथून करंट लावायचे व तीनशे ते चारशे फुटापर्यंत जिवंत विद्यूत प्रवाह खूंट्या व सेंट्रींग ताराच्या साहाय्याने निर्माण करायचा व वन्य प्राण्यांची शिकार करायचा असे सांगितले. त्याने आम्हाला पुढे नेले. वाघाची शिकार झाली तेथे त्याला नेले असता, तो त्याबाबत काही सांगण्यास तयार नव्हता. तेथून त्याने सोनपुर गावात नेले व त्याच्या घरी नेले. त्याच्या घरी त्याची पत्नी होती. तुराट्यामधून त्याने एक कूऱ्हाड व एक सत्तूर काढला. ते दाखवल्यास मी ओळखू शकतो, आता मला कूऱ्हाड व सत्तुर/सुरी दाखवण्यात आला, ते तेच आहेत, कुऱ्हाड एमओ क्र.५ व सत्तुर/सुरी एमओ क्र.६ वर आहेत. तसेच घमेले, प्लास्टीक कोटेड वायर आणि सागवानाच्या ८ खूंट्या दाखवल्यास मी ओळखू शकतो, आता मलाघमेले, प्लास्टीक कोटेड वायर आणि सागवानाच्या ८ खूंट्या दाखवण्यात आल्या, त्या त्याच आहेत, घमेले एमओ क्र.७, प्लास्टीक कोटेड वायर एमओ क्र.९ वर व सागवान खुंट्या एमओ क्र.२ वर आहेत.

त्याप्रमाणे मी जप्ती पंचनामा केला, मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला, त्यावर माझी व पंचांची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, तो नि.क्र.२४ वर आहे.

**०५.** दिनांक २०.०३.२०२५ रोजी आरोपी पंढरी कुंभरे, किशोर भलावी, छेदीराम ठाकूर व नंदू भलावी यांचे पुन्हा बयाण घेण्यात आले. मला पंढरी कुंभरे यांचे बयाण दाखवण्यात आले, त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.९०** देण्यात येते. मला किशोर भलावी यांचे बयाण दाखवण्यात आले, त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.९१** देण्यात येते. मला छेदीराम ठाकूर यांचे बयाण दाखवण्यात आले, त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.९२** देण्यात येते. मला नंदू भलावी यांचे बयाण दाखवण्यात आले, त्यावर माझी व आरोपीची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.९३** देण्यात येते. सदर बयाणांमध्ये पंढरी कुंभरे व फरार आरोपी क्र. ९ उत्तम हे शिकार करायचे, किशोर भलावी व पंढरी मोटरसायकलने गिऱ्हाईकांना मटन सप्लाय करायचे, छेदीराम ठाकूर हा पंढरी कुंभरेचा गिऱ्हाईक होता व नंदू भलावीच्या घराच्या वरच्या माळ्यावर उत्तम मेश्राम रहायचा. नंदू भलावी मोबाईलवरुन कॉन्टॅक करायचा.

**सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.04.20 17:00:44 +0530

सावनेर,
दिनांक २०.०४.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe